पुणे। मुंबई। कोल्हापूर। नाशिक। औरंगाबाद। सोलापूर। नागपूर। सातारा। जळगाव। नांदेड। अकोला येथून प्रसिद्ध SakalNews @esakalupdate Call Center : 9225800800

www.esakal.com

सकाळ

सातारा, गुरुवार, ७ जून २०१८ किंमत ₹ ४



आता वेब सिरीज
आपल्या अभिनयाचा ठसा उमटवलेली अमृता खानविलकर आता वेब सिरीजमध्ये दिसणार आहे.
टुडे

परिवर्तनाची लाट
पंतप्रधान मोदींच्या कार्याला पाठिंबा मिळत असून देशात परिवर्तनाची लाट निर्माण झाली आहे.
टुडे



# ग्रामीण मुलींना गावातच व्यावसायिक शिक्षण द्या

## तळोलीकर ; निंभोरे हायस्कूलमध्ये दोन खोल्यांसह संगणक कक्षाचे उद्‌घाटन

**फलटण शहर, ता. ६ :** ग्रामीण भागातील मुलींना दहावीनंतर घरापासून दूर पाठविण्यास पालक टाळाटाळ करतात. त्यामुळे मुलींना घरगुती स्वयंपाकगृह किंवा लग्नाच्या बंधनात सर्रास अडकविले जाते; परंतु गावातच त्यांना उच्च माध्यमिक शिक्षणाबरोबर संगणक, जीवन कौशल्य विकाससह हॉस्पिलिटीत व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करून दिल्यास त्यांचे भावी शैक्षणिक करिअर सोनेरी होण्यास निश्चित मदत होईल, असा विश्वास उषा तळोलीकर यांनी व्यक्त केला.

जय भवानी एज्युकेशन सोसायटीच्या निंभोरे (ता. फलटण) येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांना दहावीनंतरच्या शिक्षणासाठी स्थलांतर करावे लागू नये, यासाठी 'हॉटेल जॅक्सन इन्स्'च्या माध्यमातून नव्याने बांधण्यात आलेल्या दोन खोल्या, संगणक कक्षाच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. या वेळी जॅक्सन ग्रुपच्या हेड सीएसआर सोरया रेबेल्लो, न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक शिवाजी शिंदे यांची उपस्थिती होती. येथे पूर्वी आठवी ते दहावीच्या वर्गांसाठी चार खोल्या आहेत. त्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांत मुलींची संख्या जास्त असल्याने त्यांचे दहावीनंतरचे शिक्षण सुरक्षित होण्यासाठी 'जॅक्सन इन'ने 'जय भवानी'चे अध्यक्ष सह्याद्री कदम यांच्याशी चर्चा करून येथे अकरावी व बारावीचे शिक्षण उपलब्ध करून देण्याचा आग्रह धरताना त्यासाठी इमारत व शैक्षणिक साहित्य पुरविण्याची जबाबदारी उचललेली आहे त्यासाठी 'ब्रॅव्हो'ने संपूर्ण प्रकल्पासाठी अविरतपणे काम केले. कार्यक्रमास निंभोरेचे ग्रामस्थ, जॅक्सन इन ग्रुप सदस्य उपस्थित होते.



**निंभोरे : उषा तळोलीकर यांच्यासमवेत सोरया रेबेल्लो, शिवाजी शिंदे व विद्यार्थिनी आदी.**